# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# पाटण महोत्सवामुळे अर्थकारणाला मिळाली गती

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाटण :** पाटणमध्ये तीन दिवस रंगलेल्या पाटण महोत्सवाची जल्लोषात सांगता झाली. संगीत, सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थी स्पर्धा, शेतकरी मार्गदर्शन, पर्यावरण जनजागृती आणि मनोरंजनाच्या विविध उपक्रमांनी पाटण शहरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते. या महोत्सवामुळे तालुक्यातील अर्थकारणाला गती मिळाली.



पाटण येथे पार पडलेल्या महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महोत्सवाच्या पहिल्या दिवसापासूनच संगीत मैफलींनी रसिकांची मने जिंकली. स्थानिक कलाकारांसह विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कला प्रकारांना प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली. विद्यार्थी डान्स स्पर्धेत तरुणाईचा जोश आणि कलागुणांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. महिलांसाठी आयोजित 'खेळ पैठणीचा' या उपक्रमाला विशेष प्रतिसाद लाभला. महिला बचत गटांनी विविध स्टॉल्स उभारून आपल्या उत्पादनांचे सादरीकरण केले. घरगुती मसाले, हस्तकला वस्तू, खाद्यपदार्थ, वस्त्रनिर्मिती आदी उत्पादनांना नागरिकांकडून मोठी मागणी मिळाली. स्थानिक व्यापाऱ्यांनाही या महोत्सवातून मोठे व्यासपीठ मिळाले.

या तीन दिवसांत महोत्सवात लाखो रुपयांची उलाढाल झाल्याने स्थानिक लघु उद्योजक, गृह उद्योजक, महिला बचत गट आणि छोट्या व्यावसायिकांना आर्थिकदृष्ट्या मोठे बळ मिळाले. अनेक उद्योजकांना नवीन ग्राहक मिळाल्याने भविष्यातील व्यवसायासाठी नवी संधी निर्माण झाली. शेतकरी बांधवांसाठी शासनाच्या विविध योजनांची माहिती देणारे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले, तसेच कोयना पर्यावरण जागृतीअंतर्गत 'मानव-वन्य जीव संघर्ष' या विषयावर तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. महोत्सवाचा शेवट 'लकी ड्रॉ'च्या बक्षीस वितरणाने आणि सिनेअभिनेते समृद्धी जाधव यांच्या 'हसण्यासाठी जन्म आपुला' या विनोदी कार्यक्रमाने झाला. त्यांच्या उपस्थितीमुळे प्रेक्षकांमध्ये विशेष उत्साह निर्माण झाला आणि हास्याच्या लहरींमध्ये महोत्सवाची सांगता झाली. पाटण महोत्सवाने सांस्कृतिक परंपरा, सामाजिक बांधिलकी आणि विकासाचा संदेश देत तालुक्याच्या एकोप्याचे सुंदर दर्शन घडवले.

**पाटण तालुक्यातील दुर्गम भागात कार्यरत असलेल्या बचतगट तसेच लघुउद्योजकांना यानिमित्ताने एक बाजारपेठ मिळाली.**

> **"'या महोत्सवामुळे आमच्या पंखात खरेच बळ आले. आमच्या उत्पादनांना चांगला प्रतिसाद मिळाला. आम्हाला नवीन ऊर्जा आणि आत्मविश्वास मिळाला आहे.'**
>
> **उषा शिंदे,** लघु उद्योजिका

> **"** पाटण महोत्सवामुळे महिलांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. त्यांच्या व्यवसायाला एक व्यासपीठ मिळाल्याने त्यांना मोठ्या प्रमाणावर व्यवसाय करण्याची प्रेरणा मिळाली.
>
> **ॲड. तेजस्विनी पाटील**